॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

सप्टेंबर २०२०

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org



जयदेव जयदेव, जय गणराया
सकलांवर राहो, तव कृपाछाया ॥

आगमन अपुले, अति मंगलदायी
वातावरणी उत्साह, ओसंडूनी जाई ॥

प्रश्न चिंता हे तर सारे, जगण्याचे भोग
मात करण्या त्यावर, द्या हो आशिष ॥

कोरोनाची देवा, दहशत सर्वत्र
लहान मोठे सारे झाले, गलितगात्र ॥

भयभीत जन सारे, करिती प्रणिपात
शक्ती द्यावी देवा, करण्यासी मात ॥

विघ्नहर्त्या देवा, कृपा हो करावी
अमंगलाची ईडा पीडा, दूर लोटावी ॥

- शिरीष पटवर्धन

### गणेशोत्सवातील विशेष उपक्रम :

## रक्तदान

पुण्यातील गणेशोत्सव म्हणजे उत्साह, जोश, उर्जा यांचे भांडार. यावर्षी कोरोना सारख्या महाभयंकर आजाराला सामोरे जात गणेशोत्सव निर्विघ्नपणे आणि संयमित वातावरणात पार पडला.

‘स्व’ -रूपवर्धिनी गणेशोत्सवात दरवर्षी ढोल-ताशे पथक, पथनाट्य अश्या अनेक पद्धतीने सहभागी होते. परंतु या वर्षी नव्याने आणि वेगळ्या पद्धतीने आपण गणेशोत्सव कार्यात सहभागी झालो. यामध्ये पुणे शहरातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन कला स्पर्धा, युवा गटासाठी गुगल मिट द्वारे बौद्धिक व्याख्याने, पुणे महानगरपालिकेसोबत मूर्ती संकलन केंद्रात सहभाग, गणेश मंडळासोबत रक्तदान शिबीरांचे आयोजन अश्या चार पद्धतीने संस्थेचे कार्य झाले.

आपल्या सर्वांना माहिती आहे कोरोना पार्श्वभूमीवर रक्तदान शिबीर घेण्यावर मर्यादा आली आहे. प्रत्येक रुग्णालयात रक्ताचा तुटवडा भासत आहे. ही गरज लक्षात घेता संस्थेने गणेश मंडळांना सोबत घेत रक्तदान शिबिराचे आयोजन केले.

‘मैं कहा अकेला हूँ साथ है ये कारवा !’ ओळीप्रमाणे गणेश मंडळांनी संस्थेला साथ दिली. गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या कालावधीत एकूण १२ मंडळांसोबत १२ वेगवेगळ्या ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. एकूण ७ रक्तपेढ्यांचे सहकार्य उपक्रमासाठी झाले. तर आयोजन करताना ५० नवीन कार्यकर्ते संस्थेशी जोडले गेले. या रक्तदान मोहिमेत ४९९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. समाजहिताचे कार्य पार पडण्यासाठी अश्या अनोख्या पद्धतीने संस्थेने पाऊल उचलले आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. तर विशेष म्हणजे यातील अनेक गणेश मंडळांनी पुढील वर्षी देखील असेच उपक्रम घेण्याचा संकल्प केला. अश्या पद्धतीने कै. किशाभाऊंच्या स्वप्नातील सामाजिक सेवेकरी कामातून निर्माण करण्याचा आपला हेतू साध्य झाला.

रक्तदान शिबिरात एकूण १२ युवक-युवतींनी केंद्र प्रमुख म्हणून काम केले तर उपक्रम प्रमुख म्हणून श्री. राहुल शिळीमकर हा युवक कार्यकर्ता होता.

रक्तदान शिबिराचा संख्यात्मक तपशिल

- कालावधी - २२ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२०.
- एकूण शिबिरे - १२.
- सहभागी गणेशोत्सव मंडळे - १२.
- सहभागी रक्तपेढ्या - ७.
- एकूण रक्तदाते - ४९९.
- मंडळातील सहभागी कार्यकर्ते - ५०.

गणेश मंडळापैकी एका अध्यक्षाचे मनोगत पुढीलप्रमाणे -

‘आमच्या लोहियानगर वस्तीमधील गणेश मंडळाने प्रथमच असा रक्तदान शिबिराचा उपक्रम आयोजित केला. याचा फार आनंद होत आहे. दर वर्षापासून असे शिबीर घेण्याचा संकल्प आहे.’

**- श्री. रोहित भोंडे**

*(अध्यक्ष - छत्रपती शिवाजी महाराज मंडळ)*



## गणेशोत्सव व्याख्यानमाला



वर्धिनी गेली चार दशके पुण्यातील गणेशोत्सवामध्ये हिरीरीने सहभागी होत आहे. ढोल ताशा पथक, पथनाट्य, ध्वजपथक, लेझिम पथक इत्यादी माध्यमातून पुण्यातील अनेक नामांकित गणेश मंडळांसमोर आपली सेवा वर्धिनीने रुजू केली आहे. यंदाच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर समाजप्रबोधनासाठी वर्धिनीने ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन केले. पूर्वी लो. टिळकांच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे व्याख्याने, तो एक प्रकारचा ज्ञानयज्ञ असायचा. संघटन आणि समाज प्रबोधन हा त्यामागचा मुख्य उद्देश असे. या हेतूने यंदा आपल्या कार्यकर्त्यांचे प्रबोधन व्हावे यासाठी तीन सत्रे झाली.

## पहिले पुष्प

### मा. श्री. दिग्पाल लांजेकर यांची मुलाखत

**विषय - ‘प्रवास कलाकारातील कार्यकर्त्याचा’**
**दिनांक - २३ ऑगस्ट २०२०**



प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक (फर्जंद, फत्तेशिकस्त, जंगजौहर) लेखक, अभिनेता श्री. दिग्पाल लांजेकर यांची प्रवीण पासलकर या युवा कार्यकर्त्यांनी घेतलेली मुलाखत उद्बोधक झाली. त्यातील काही ठळक मुद्दे -

- चित्रपट क्षेत्रातील सहाय्यक ते दिग्दर्शक हा अचंबित करणारा प्रवास त्यांनी मोकळेपणाने उलगडून सांगितला. या प्रवासात लहानपणी झालेले कसबा पेठेच्या वातावरणातील, संघ शाखेतील स्वयंसेवक म्हणून, वर्धिनीत वर्धक म्हणून झालेले संस्कार तसेच प्रसिद्ध इतिहासकार निनाद बेडेकर, राजन जोशी सर, ज्ञानेश पुरंदरे सर, आणि त्यांचे आजोबा यांच्याकडून ऐकलेल्या शिवाजी महाराजांच्या व इतर ऐतिहासिक गोष्टी या सर्वांचे खूप मोठे योगदान आहे. यातुन मला इतिहासाची गोडी लागली.
- वाचाल तर वाचाल - आयुष्यातील तणावपूर्ण प्रसंगात मला पुस्तकांनी हात दिला. गो. नी. दांडेकर यांची ‘मोगरा फुलला’ कादंबरी , स्वा. सावरकर यांचे

'माझी जन्मठेप' हे चरित्र अशा अनेक पुस्तकातून, संतांच्या चरित्रातून त्यांनी भोगलेल्या कष्टदायी दुःखकारक प्रसंगापुढे, स्वातंत्र्यचळवळीत भोगलेल्या अपार वेदना, हाल-अपेष्टा यांच्यापुढे आपली संकटे खूप फिकी आहेत हे जाणवले. आणि हार न मानता मी पुढे जात राहिलो.

■ दिग्दर्शक झाल्यावर सिनेमा क्षेत्रातील प्रत्येक विभागात काम करता येते. तसेच दिग्दर्शक हा सिनेमाच्या माध्यमातून कथाकथन करत असतो आणि गोष्ट सांगायला मला मनापासून आवडते म्हणून मी दिग्दर्शक झालो.

■ चित्रपट निर्मिती म्हणजे विषय - संकल्पना - कथा - पटकथा - संवाद हा पूर्व निर्मितीतील टप्पा तसेच कास्टिंग, प्रॉडक्शन, एडिटिंग इत्यादी विभागांचे एकत्रित काम. हे एक मोठे गटकार्यच असते.

■ श्री. दादा पासलकर हे माझे पहिले गुरु. नंतर या क्षेत्रातील अनेक दिग्गज लोकांकडून वेगवेगळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या. मी प्रा. शामराव जोशी यांच्याकडे अजूनही या क्षेत्रासाठी अभ्यास करत आहे. यामुळे माझ्यातला विद्यार्थी आणि वर्धक सदैव जागा राहातो.

■ युवकांसाठी विशेष - तुम्ही निवडलेल्या क्षेत्रात तुमचा स्वतःचा नियमित रियाज, स्वाध्याय व्हायला हवा. अनेक लोकांना भेटून त्यांच्या अनुभवातून आपण आपल्या जाणिवा समृद्ध केल्या पाहिजेत. चित्रपट क्षेत्रातल्या होणाऱ्या ऑडिशन्समधून फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. सिंहगड परिसरात झालेली पार्टी परत कोठेही होऊ नये, यासाठी माझ्याकडून झापुंनी पथनाट्याचे रेकॉर्डिंग करून घेतले. तेव्हा असे लक्षात आले की तुमच्याकडे जे साधन उपलब्ध असेल त्याचा वापर करून तुम्ही चांगल्या गोष्टी समाजात रुजण्यासाठी काम केले पाहिजे.

## दुसरे पुष्प

### ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त)

**विषय - चीन व पाकिस्तानचे भारताविरुद्ध हायब्रीड वॉर आणि भारताचे प्रत्युत्तर**

**दिनांक २५ ऑगस्ट २०२०**



ब्रिगेडिअर महाजन ७ लाइफ मराठा इन्फंट्री तुकडी मध्ये कार्यरत होते. तसेच ऑपरेशन रक्षक मध्ये त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. 'युद्ध सेवा' मेडलने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या भाषणातून मांडले गेलेले ठळक मुद्दे -

■ सर्वप्रथम चीन, पाकिस्तान या दोन्ही देशांना लागून असलेला भारताचा भौगोलिक प्रदेश आणि त्यांच्या सीमा याची ओळख त्यांनी करून दिली. Line of actual control बद्दल सखोल माहिती दिली.

■ सध्या सुरू असलेल्या भारत-चीन सीमा वादाची पार्श्वभूमी व पेंगोंग लेक चा २/३ भाग चीनने कसा बळकावला याची माहिती सांगितली. सध्या या भागाचा १/३ भाग भारताकडे आहे.

■ गलवान खोऱ्याचे महत्त्व - ते म्हणाले की चीनला वाटते की गलवान खोरे वापरून भारत अक्साई चीनवर आक्रमण करेल. भारताने दारबुक दौलत बेग ओल्डी रस्ता बांधला आहे. हा रस्ता २५५ किलोमीटर लांब असून रसद पुरवठयाच्या दृष्टीने, व्यूहरचनात्मक तसेच सैन्याच्या बदलाकरिता खूप महत्त्वाचा आहे. यामुळे उत्तम निगराणी करून आक्रमणास चोख उत्तर देखील देता येत आहे.

■ १५ जून २०२० च्या चकमकीत नेमके काय घडले याची माहिती सरांनी दिली. देशाची सुरक्षा आणि सन्मान हा सर्वप्रथम प्रत्येकाने जपायला हवा. भारताचा भौगोलिक प्रदेश व समुद्रकिनारा याच्या दृष्टीने चीन किंवा अन्य लगतची राष्ट्रे आपल्या अर्थव्यवस्थेला हानी पोहचवू शकत नाहीत. या उलट भारत काही देशांच्या समुद्र व्यापारावर बंधन आणू शकतो. जेव्हा राष्ट्रावर चहूबाजूंनी संकटं येतात, आशेचा दीप दुरूनही दिसत नाही तेव्हा देशाची परीक्षा म्हणजेच सर्व नागरिकांची परीक्षा असते. प्रत्येकाने आपले नागरिकत्व जागे ठेऊन वागले पाहीजे. कोरोना काळातही 'converting crisis into opportunity' हे लक्षात ठेवून आपली कृती असली पाहिजे.

## तिसरे पुष्प

### डॉ. भूषण केळकर (Director, MoebiuSutra Consulting Pvt. Ltd.)

**विषय - How the employment opportunities will change with Industry 4.0 & Post Covid-19 world**

**दिनांक - २८ ऑगस्ट २०२०**



त्यांच्या मार्गदर्शनातील काही विशेष मुद्दे -

■ INDUSTRY 4.0 म्हणजे नक्की काय, त्याचा इतिहास, आधीच्या इंडस्ट्रीज आणि यामधील फरक, तसेच ह्या संकल्पनेची सुरवात कशी झाली या मूलभूत गोष्टी त्यांनी स्पष्ट केल्या. सरांनी त्यांच्या सादरीकरणाला Google++ carrier building असे नाव का दिले आहे ते सांगितले.

■ Internet आणि Industry 4.0 - ही इंडस्ट्री पूर्णपणे इंटरनेट वर आधारित आहे. सायबर सिक्युरिटी, आर्टिफिशल इंटेलिजन्स हे सर्व इंडस्ट्री ४.० यांचा एक भाग आहे. भविष्यात अशी अनेक क्षेत्र यात सामावली जातील.

■ Covid-19 आणि Industry 4.0 - या संकल्पनेचा सध्याच्या कोरोना काळात खूप उपयोग झाला. जसे की रुग्णालयात रुग्णांची सेवा करण्यासाठी,कोरोना संसर्गातून वाचण्यासाठी रोबोटचा वापर करण्यात आला. तसेच 3D Printing द्वारे अँटी व्हायरल मास्क आणि इतर मेडिकल इक्विपमेंट्स बनवण्यात आली.

■ मनुष्य शक्तीचा वापर - Industry 4.0 मुळे आधुनिक आणि डिजिटल कार्यपद्धती अस्तित्वात आली. त्यामुळे कामात सुसंगती वाढली आणि वेळेची बचत झाली. आपण सर्वांनी होणाऱ्या बदलांमुळे आपले ज्ञान वाढवले पाहिजे. म्हणजेच upgrade झाले पाहिजे.

■ Industry 4.0 चे इतर क्षेत्रातील कार्य - या संकल्पनेचा इतर अनेक क्षेत्रात वापर चालू आहे. जसे

चित्रकलेसारख्या विषयात एका गणिती सूत्राद्वारे व्यक्तीचे चित्र बनवता येते. SHELBY या यंत्राने स्वतःहून गुढकथा लिहिल्या आहेत. एक यंत्रमानव न्यायालयात न्यायाधीशाचे काम अगदी सुलभपणे व अचूकपणे करत आहे.

■ Industry 4.0 चे भविष्य - ही संकल्पना ग्राहकांच्या गरजांना आज शक्य तितक्या वेगाने प्रतिसाद देण्यास अनुमती देते. यामुळे उत्पादकता आणि उत्पादन प्रक्रियेची गुणवत्ता सुधारते आणि नवीन व्यवसाय, मॉडेल्स, उत्पादन प्रक्रिया आणि इतर कल्पनांचा अवलंब करण्यासाठी पाया घातला जातो.

■ Google++ करियर पंचसूत्री -

१) विश्लेषणातून (analysis) आपण संश्लेषणाकडे (synthesis) जायला हवे.

२) Emotional Quotient व Adaptability Quotient कडे वळायला हवे.

३) निरंतर शिक्षणाकडे (continuous learning) वळायला हवे.

४) नवनिर्मितीकडे जाणारा रस्ता धरायला हवा.

५) संयुक्त शिक्षणावर (Combinatorial learning) भर द्यायला हवा.

सरांनी मार्गदर्शनात १२ सुक्ष्म प्रणालींवर भर दिला. त्या म्हणजे कमीत कमी २ वेगवेगळ्या विषयात पदवी शिक्षण घ्या, आपली कौशल्ये विकसित करा, डिजिटल प्रेझेन्स वाढवा, संवादकौशल्य वाढवा, नवीन भाषा शिका, सामान्य ज्ञान वाढवा, स्वतःची ओळख लक्षात ठेवा, समाजासाठी आपण काम केले पाहिजे हे ही लक्षात ठेवा. वर्धिनी सारख्या सामाजिक काम करणाऱ्या संस्थांनी सुद्धा तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन कामकाजात वाढवला पाहिजे असा मोलाचा सल्ला सरांनी व्याख्यानातून दिला.

## गणेश मूर्ती संकलन



गेल्या काही महिन्यांपासून कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गामुळे निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीत 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवांनी अभिमानास्पद काम केले. याचाच पुढचा टप्पा म्हणून पुणे महानगरपालिकेने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या पर्यावरण अनुकूल गणेश विसर्जन अभियानात कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. कोरोनामुळे अनंत चतुर्दशीला मिरवणुका नव्हत्या, ढोल ताशा पथके नव्हती. पण सामाजिक जबाबदारीने ढोल पथकातील तरुणाईने 'स्व'- रुपवर्धिनीच्या माध्यमातून कोरोनाचा जास्त संसर्ग असलेल्या प्रभागात वस्तीत जाऊन योग्य सुरक्षा घेत पर्यावरण अनुकूल गणेश विसर्जन अभियानात काम केले.



या अभियानात ६०० युवा कार्यकर्ते सहभागी झाले. पुणे महानगरपालिका हद्दीतील ७ क्षेत्रीय कार्यालयातील ७२ मूर्ती संकलन केंद्रांवर आणि ८ फिरत्या हौदांवर गणेश मूर्ती विसर्जन, मूर्ती संकलन, अमोनियम बायकार्बोनेट पावडर वाटप, निर्माल्य गोळा करणे, भक्तांना शिस्तीने विसर्जन करण्यास सांगणे, त्यांची नावनोंदणी करणे, परिसरातील मूर्ती संकलन केंद्रावर आणणे, नदी पात्रातील विसर्जन थांबवणे अशी अनेक कामे या स्वयंसेवकांनी केली आणि हजारो मूर्तींचे संकलन केले.

या अभियानात 'स्व'-रुपवर्धिनीसह पुण्यातील नामांकीत पथके जसे रमणबाग, श्रीराम पथक, ज्ञान प्रबोधिनी व अन्य १२ पथकांचा देखील उत्स्फूर्त सहभाग होता. क्षेत्रीय आरोग्य अधिकारी आणि मुकादम यांनी युवा स्वयंसेवकांचे खूप खूप कौतुक केले व अत्यंत कठीण काळात मोलाची मदत केली म्हणून आभार व्यक्त केले.

युवा कार्यकर्ते अशोक इंगवले, प्रशांत तांबे, अमोल शेलार , राहुल पायगुडे यांनी या अभियानाचे नियोजन व अंमलबजावणी केली.



**उपक्रमात सहभागी झालेल्या युवतींचे अनुभव:**

■ यंदाचा गणेशोत्सव हा पर्यावरणपूरक, वेगळा आणि शिस्तबद्ध असा होता. 'स्व' - रूपवर्धिनीने विसर्जन अभियानात महानगरपालिकेच्या कामात हातभार लावण्याचा प्रयत्न केला. वर्धिनीत आपण आहोत म्हणून आपल्याला आज मूर्ती संकलन उपक्रमात भाग घेता आला याचा सार्थ अभिमान आहे.

***- सोनाली यादव***

■ नागरिक विविध भागातून मूर्ती विसर्जन आणि दान करण्यासाठी येत होते. आपल्या युवक युवतींचा गट शिस्तबद्ध पद्धतीने काम करत होता. प्रत्येकजण आपली कामगिरी पार पाडत होता. अनेक नागरिकांना आपलं काम खूप आवडलं आणि तसे अभिप्राय पण त्यांनी दिले. यातून आपल्या युवक-युवतींशी संवाद साधला गेला.

***- मृणाल सुतार***



■ काही व्यक्तींना विसर्जनाची नवीन पद्धत पटत नव्हती तरीही आपण वाद न घालता त्यांच्याशी सुसंवाद साधून आपलं काम सोपं कसं करता येईल हे पाहिलं आणि अनेक नागरिक पर्यावरण पूरक विसर्जनात सहभागी झाले. त्यांचा प्रतिसाद उत्तम मिळाला, म्हणजे सामाजिक अंतर ठेवणे, मास्क लावणे इत्यादी. मला पर्यावरण पूरक उपक्रमात समाजासाठी काम करायला मिळालं याचा अभिमान वाटतो.

***- पूर्वा निनाल***

■ पर्यावरण पूरक गणेशोत्सव कसा असावा तर तो असा असावा. लहान मुलांना विसर्जनासाठी सोडत नव्हते तर काही मुले बाप्पा चालले म्हणून रडताना दिसली. एकाने तर चिठ्ठी लिहून गणपती बाप्पा सोबत पाठवली होती. अशा संमिश्र अनुभवातून मला काम करताना आनंद वाटला.

***-धनश्री शिंदे***





मूर्ती संकलनाचा उपक्रम चांगल्या रीतीने पार पडला. नेहमी गणपतीत ढोल पथक, ध्वज, मल्लखांब, पथनाट्य असतातच पण मूर्ती संकलनाचा हा अनुभवही वेगळा आणि पहिलाच होता. लोकांनी सहकार्य केलं. गर्दी होऊ न देता, लोकांच्या श्रद्धेला धक्का न लागता तसेच स्वत:ची काळजी घेत सर्व कार्यकर्त्यांनी आपापली जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडली. नागरिकांनी कामाबद्दल उत्तम प्रतिसाद दिला व कामाबद्दल छान अभिप्राय दिले, .

*- पूर्वा भिडे*

# गणेशोत्सवातील उपक्रमांना विशेष प्रतिसाद

सम्राट अमय थोरात

[illegible]

पुणे महानगरपालिका

मोबाईल : [illegible]

दिनांक : [illegible]

[illegible]

प्रति,

स्व - रूपवर्धिनी

पुणे शहर

विषय : गणेशोत्सवात [illegible]

महोदय,

[illegible]

आपला विश्वासू

सकाळ

३ सप्टेंबर २०२०

## 'स्वरूपवर्धिनी'कडून कोरोना 'हॉटस्पॉट'मध्ये मूर्ती संकलन

पुणे, ता. २ : महापालिकेने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या पर्यावरण अनुकूल गणेश विसर्जन अभियानात स्व-रूपवर्धिनी आणि अन्य ढोल पथकांचे ६०० युवक युवती वादक सहभागी झाले.

महापालिका हद्दीतील ७ क्षेत्रीय कार्यालयातील ७२ मूर्ती संकलन केंद्रावर आणि ८ फिरत्या हौदावर गणेश मूर्ती विसर्जन, मूर्ती संकलन, अमोनिअम बाय कार्बोनेट पावडर वाटप, निर्माल्य गोळा करणे, आदी कामे स्वयंसेवकांनी केली. सामाजिक जबाबदारीने ढोल पथकातील तरुणाई 'स्व - रूपवर्धिनी'च्या माध्यमातून कोरोनाचे हॉटस्पॉट असलेल्या प्रभागात वस्तीत जाऊन गणेश विसर्जन अभियानात उत्साहाने काम केले. या अभियानात रमणबाग, श्री राम पथक व ज्ञान प्रबोधिनी व अन्य १२ पथकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. स्व-रूपवर्धिनीचे अशोक इंगवले, प्रशांत तांबे, अमोल शेलार, राहुल पायगुडे यांनी या अभियानाचे नियोजन व अंमलबजावणी केली.



## विसर्जन अभियानात तरुणांचा सहभाग

पुणे : पुणे महापालिकेने आयोजित केलेल्या गणेश मूर्ती विसर्जन अभियानाला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरण अनुकूल गणेश विसर्जन अभियानामध्ये विविध ढोल पथकांचे ६०० तरुण सहभागी झाले होते.

या अभियानामध्ये स्व-रूपवर्धिनीसह रमणबाग, श्री राम पथक आणि ज्ञान प्रबोधिनीसह पुण्यातील नामवंत १२ पथके सहभागी झाली होती. अधिकाऱ्यांनी युवा स्वयंसेवकांचे कौतुक केले. स्व-रूपवर्धिनी या सामाजिक संस्थेचे अशोक इंगवले, प्रशांत तांबे, अमोल शेलार, राहुल पायगुडे यांनी या अभियानाचे नियोजन केले.

महाराष्ट्र टाईम्स

३ सप्टेंबर २०२०

## पर्यावरणपूरक गणेश विसर्जन अभियानात ढोल-ताशा पथकांतील वादक स्वयंसेवक

करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी महापालिकेतर्फे राबविण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणेश विसर्जन अभियानात ढोल-ताशा पथकांतील वादक स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले होते. स्व-रूपवर्धिनी आणि अन्य ढोल पथकांचे ६०० युवक-युवती वादक या अभियानात सहभागी झाले होते. महापालिका हद्दीतील सात क्षेत्रीय कार्यालयांतील ७२ मूर्ती संकलन केंद्रावर आणि ८ फिरत्या हौदावर गणेश मूर्ती विसर्जन, मूर्ती संकलन, अमोनियम बाय कार्बोनेट पावडर वाटप, निर्माल्य गोळा करणे, मखराचा संगीत लावून विसर्जन करण्यास सांगणे, नावनोंदणी करणे, विसर्जित मूर्ती मुख्य केंद्रावर पोहोचविणे, परिसरातील मूर्ती संकलन केंद्रावर आणणे आणि नदी पात्रातील घाटात स्वयंसेवक म्हणून थांबून विसर्जन नदीत न करू देणे अशी कामे या स्वयंसेवकांनी केली. या वर्षी विसर्जन मिरवणूक नसल्याने ढोल-ताशा पथकांतील तरुणाईने 'स्व-रूपवर्धिनी'च्या माध्यमातून प्रतिबंधित क्षेत्रातील वस्तीत जाऊन योग्य सुरक्षा घेत पर्यावरणपूरक गणेश विसर्जन अभियानात उत्साहाने काम केले. रमणबाग, रमणबाग, श्री राम पथक आणि ज्ञान प्रबोधिनीसह अन्य १२ पथकांतील युवा वादकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. स्व-रूपवर्धिनी संस्थेचे अशोक इंगवले, प्रशांत तांबे, अमोल शेलार, राहुल पायगुडे यांनी या अभियानाचे नियोजन केले होते.

लोकसत्ता

३ सप्टेंबर २०२०

## सांस्कृतिक विभाग

यंदाच्या वर्षी सांस्कृतिक विभागाअंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये पुणे शहरातील ५ ते २५ वर्षे वयोगटातील एकूण २०९ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये वैयक्तिक स्पर्धा व कौटुंबिक स्पर्धा अश्या दोन स्पर्धांचा समावेश होता. निबंध, कविता, नृत्य, चित्रकला, गायन, संगीत व अश्या अनेक कला प्रकारांमध्ये स्पर्धकांनी आपली कला सादर केली. सदर स्पर्धा आयोजनाचे काम वैदेही बेहेरे, हेमंत शिर्के व हनुमान मेकडे यांनी पाहिले. स्पर्धेचे परीक्षण हर्षदा शिंदे, तेजश्री शिंदे, मंदार पोफळे, सुरेश पवार यांनी केले. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सहभागाचा फिरता चषक भगिनी निवेदिता शाखेने पटकावला.







| स्पर्धकाचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| वैभव नागपूरे | निबंध | प्रथम क्रमांक |
| भूषण करडे | कविता | द्वितीय क्रमांक |
| पूर्वा भागवत | नृत्य | तृतीय क्रमांक |
| श्रावणी थोरात | चित्रकला | उत्तेजनार्थ |
| इरा धायरकर | गीत | उत्तेजनार्थ |
| सान्वी देशपांडे | Instrumental | उत्तेजनार्थ |



| स्पर्धकाचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| समृद्धी यादव | निबंध | प्रथम क्रमांक |
| प्राजक्ता बांदल | कविता | द्वितीय क्रमांक |
| मृणाल सुतार | गीत | तृतीय क्रमांक |
| अक्षय देशमुख | Instrumental | उत्तेजनार्थ |



| स्पर्धकाचे नाव | क्रमांक |
|---|---|
| निरंजना मुळे व कुटुंब | प्रथम क्रमांक |
| रवींद्र लाड व कुटुंब | द्वितीय क्रमांक |
| अवनिश, राशी व कुटुंब | तृतीय क्रमांक |
| वैष्णवी परदेशी आणि कुटुंब | उत्तेजनार्थ |



## आमचे युवा - आमची ताकद



संघटनेत असे काही हाडाचे कार्यकर्ते असतात ज्यांना आपण एक फोन करावा,काही काम सांगावे आणि त्याने लगेच 'हो' म्हणावे. यापैकीच एक अशोक इंगवले. ब्रह्मानंद शाखेतली ही जबाबदारी घेणार का ? नवीन शाखा सुरू करतोय शाखाप्रमुख होणार का ? भागप्रमुख पदावर संघटनेचे काम करणार का ? या सगळ्यांना 'हो' असे उत्तर देणे आणि कार्यास तत्पर राहणे हे अशोकचे वैशिष्ट्य. केंद्रीय संक्रात उत्सव प्रमुख असताना अशोकची आई रुग्णालयात उपचारासाठी दाखल होती परंतु ही गोष्ट कोणालाही कळू न देता अशोकने संपूर्ण उत्सव व्यवस्थित पार पडला. यंदा देखील गणेशोत्सवाचा 'उत्सव प्रमुख' म्हणून जबाबदारी घेताना कोणतेही आढेवेढे न घेता, अतिशय आनंदाने त्याने ही जबाबदारी स्वीकारली. यंदाचा उत्सव साजरा करताना आपल्यावर कोरोनाचे सावट होते. आणि प्रत्यक्ष भेटी आणि बैठका घेणे शक्य नव्हते. पण तरीही व्याख्यानमाला, सांस्कृतिक स्पर्धा, रक्तदान शिबिरे आणि गणेश मूर्ती संकलन अभियान असे अनेक उपक्रम अशोकने लीलया पेलले. स्वतःचा व्यवसाय आणि कुटुंब सांभाळत रोजचे दोन-तीन तास उत्सवाच्या कामांसाठी देताना अशोकने कधी तक्रार केली नाही. 'प्रत्येक कामासाठी व्यक्ती प्रत्येक व्यक्तीसाठी काम' हे सूत्र डोक्यात ठेवत अशोकने उत्सव यशस्वी केला. कार्यकर्ता हा संघटनेचा मुख्य आधार असतो हे अशोकच्या उदाहरणावरून पुन्हा एकदा सिद्ध झाले.

# शाखा विभाग

## समर्थ रामकृष्ण शाखा

या महिन्यात शाखेने 'रामकृष्ण केबल नेटवर्क चॅनेल' या नवीन उपक्रमाची सुरुवात केली.यामध्ये वेगवेगळे विषय व्याख्याने, मुलाखती, चर्चासत्रे अशा विविध माध्यमातून वर्धकापुढे मांडण्यात आले. रामकृष्ण केबल नेटवर्कचे 5 Episodes (भाग) प्रदर्शित करण्यात आले. यामध्ये लोकशाहिर आण्णा भाऊ साठे जयंती निमीत्त श्री. तुषार नांगुर्डे यांनी चरित्र मांडणी केली. क्रांतीदिनानिमित्त रोहित धायरकर दादाने जगात झालेल्या अनेक क्रांतीची माहिती मुलांना सांगितली. तसेच १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त मा. सचिन सनगरे यांचे व्याख्यान झाले. गणेशोत्सव विशेष उपक्रमात गणेशोत्सव साजरा करण्याचे बदलते टप्पे याविषयी चर्चा झाली. गणेशोत्सवावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

रक्षाबंधन विशेष उपक्रमात वर्धकांनी स्वतः राखी बनवली आणि ती आपल्या कुटुंबातील आवडत्या व्यक्तीला बांधून त्याचे कारण गटावर लिहून पाठवले.

## स्वामी ब्रह्मानंद शाखा

ऑगस्ट महिन्यात रविवारी ऑनलाईन शाखा घेण्यात आली. या शाखेत नेहमीप्रमाणे वंदन, व्यायाम, कार्यक्रम आणि शेवट संकल्प प्रार्थना असा क्रम होता.

९ ऑगस्ट :- शब्दांची, अक्षरांची गंमत अशी स्पर्धा घेण्यात आली. क्रांतिदिनाचे महत्त्व सांगण्यात आले.

२३ ऑगस्ट गणेशोत्सव विशेष : नेहमीप्रमाणे शाखा मैदानाने सुरु झाली. यामध्ये नववीतील वेदांत मंचेकर याने सूर्यनमस्कार, जोर, बैठका असे व्यायाम घेतले. गणेशोत्सव असल्याने प्रत्येकाने फोनच्या माध्यमातून घरातील बाप्पाची आरास सगळ्यांना दाखवली. प्रत्यक्ष भेट होत नसली तरी घरातल्या बाप्पाचे दर्शन घेता आले. संपूर्ण महिनाभर रोज दिनविशेष स्वरुपात व्यक्तीची, प्रसंगाची किंवा घटनेची माहिती पालक गटात पाठवण्यात आली.

तासिका व्यवस्थेत लहान गटासाठी गणित, मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांचा गृहपाठ देण्यात आला. सर्व इयत्तांची गणित विषयाची २० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली.

## स्वामी दयानंद सरस्वती शाखा

९ ऑगस्ट : ऑनलाइन शाखेत मेघा नगरे ताईंनी वर्धकांशी व त्यांच्या पालकांशी संवाद साधला. वर्धकांना 'श्यामची आई' पुस्तकातील गोष्ट सांगितली. शाखेत सुविचार, बोधकथा असा परिपाठही घेण्यात आला.

गणेशोत्सवानिमित्त विशेष सजावट व छायाचित्र ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत वर्धकांनी निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी घेऊन पर्यावरणपूरक सजावट केली. काही वर्धकांच्या घरी त्यांनीच बनविलेल्या मातीच्या मुर्तीची स्थापना झाली. त्याचबरोबर शाखेतील वर्धकांच्या व युवकांच्या घरी ऑनलाइन गणपती आरती घेण्यात आली.

## स्वामी श्रद्धानंद शाखा

स्वामी श्रध्दानंद शाखेच्या इतिहासातील पहिली ऑनलाईन शाखा गुरूवार दिनांक ६/८/२०२० रोजी गुगल मीटच्या सहाय्याने घेण्यात आली. वंदन घेऊन शाखेची सुरूवात झाली. यानंतर हर्षवर्धन गायकवाड दादाने सर्वांचा व्यायाम घेतला. महेश ढवळे दादाने तासिकेमध्ये एका व्हिडिओच्या माध्यमातून गुणाकारच्या एकदम सोप्या पद्धती शिकवल्या. प्रसाद दासरी दादाने मुलांना बोधकथा सांगितली आणि शाखेचा समारोप झाला.

### कौशल्य विषयक व्याख्याने

**विषय : वक्तृत्व कौशल्य** — **मार्गदर्शक : मा. सृष्टी कार्ला (दिल्ली)**
**विषय : आर्थिक साक्षरता** — **मार्गदर्शक : श्री. मंदार पोफळे (पुणे)**
**विषय : सादरीकरण कौशल्याचे महत्व आणि गरज.** — **मार्गदर्शक : श्री. संतोष परंडवाल (मुंबई )**

९ ऑगस्ट : शाखेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यात सुरूवातीला मुलांसाठी 'मस्ती कि पाठशाला' या कार्यशाळेमध्ये सिद्धेश बलवार दादाने घरात उपल्ब्ध साहित्यापासून मास्क बनविण्याचे प्रशिक्षण, प्रफुल्ल कांबळे दादाने योगसनांची प्रात्यक्षिके आणि त्यांचे महत्त्व आणि उज्ज्वल वाघुले दादाने वैज्ञानिक प्रयोग असे उपक्रम घेतले. याच कार्यक्रमात 'Work Book' या तासिका विभागाच्या उपक्रमाचे उदघाटन झाले.

- वर्धापनदिन मुख्य कार्यक्रम शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२० रोजी संपन्न झाला. मा. श्री. शिरीष पटवर्धन हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. श्री. मकरंद ढवळे (रा. स्व. संघ समरसता गतिविधी संयोजक) यांनी 'स्वयंपुर्ण आणि परोपकारी पिढी तयार करण्याचे काम 'स्व'-रूपवर्धिनी करत आहे' अशा शब्दात संस्थेचा गौरव केला.
- मास्क वाटप : गणेशोत्सव काळात युवक आणि मोठ्या गटातील वर्धक यांच्या मदतीने दि. २२ ऑगस्ट ला सर्व नियमांचे पालन करून मास्क वाटप करण्यात आले.

## भगिनी निवेदिता शाखा

■ दि. २ ऑगस्ट : मुलींना जयश्री ताईनी दोन मित्रांची गोष्ट सांगितली. त्या गोष्टीमधून "जेव्हा आपल्याला कोणी दुःखी करते तेव्हा ते वाळूवर लिहावे कारण क्षमेच्या वाऱ्याने ते आपोआप पुसले जाते. पण जर कोणी आपल्यासाठी चांगले केले तर आपण दगडावर कोरुन ठेवावे जेणे करुन कुठलाच वारा ते नष्ट करु शकणार नाही." असा बोध वर्धिकांना मिळाला.

■ दि.९ ऑगस्ट : अनुभव कथन
प्रियंकाताई घारे : मेळघाट (मैत्री संस्था)
दिव्याताई घारे : मध्यप्रदेश (नर्मदालय)
समृद्धीताई यादव : केरळ (पूरग्रस्त मदत कार्य)

■ दि. १६ ऑगस्ट : कल्पनेतून गोष्टनिर्मिती - यामध्ये कोमल ताईंनी मुलींशी संवाद साधताना आपण आपल्या कल्पना कशा विस्तारू शकतो हे सांगितले यातून युवतींनी आणि वर्धिकांनी स्वतःच्या कल्पना वापरून एक छान गोष्ट तयार केली.

■ दि. ३० ऑगस्ट : 'वर्धिनीची शाखा आणि आपण'

या ऑनलाईन शाखेमध्ये मंदार दादाने वर्धिनीच्या शाखा का असतात ? आणि शाखेमध्ये येण्याचा आपल्याला काय फायदा होतो ? हे उदाहरण देऊन सांगितले. यावेळी शिबिराच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या नवीन मुली आणि त्यांचे पालकही उपस्थित होते.

## वस्ती विकास प्रकल्प

■ ऑनलाईन अभ्यासिका :- कोरोनाच्या काळात प्रत्यक्ष अभ्यासिका घेणं शक्य नाही. तरीही गेले दोन महिने नियमित आणि नियोजनपूर्वक तीनही भागात अभ्यासिका सुरु आहेत.

■ १५ ऑगस्ट दिनानिमित्त विशेष स्पर्धा घेण्यात आल्या.
१) वक्तृत्व स्पर्धा
२) निबंध स्पर्धा
३) चित्रकला स्पर्धा

■ समर्थ भारत पुनर्बांधणी अंतर्गत कसबा भागात सर्वेक्षण फॉर्म भरणे सुरू आहे. कोरोनामुळे उद्भवलेल्या आर्थिक तणावाच्या परिस्थितीत वस्तीतील नागरिकांना सदर उपक्रमाद्वारे रोजगार आणि व्यवसाय मार्गदर्शन केले जात आहे.

## स्पर्धा परीक्षा केंद्र

२६ जुलै कारगील विजय दिन :
'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिका विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या दिवशी ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'डोकलाम ते गलवान - चीनचे मनसुबे' या विषयावर लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त) यांनी मार्गदर्शन केले. गलवान खोऱ्याच्या भागात ते स्वतः कार्यरत होते. त्यांनी तेथील भौगोलिक व सामरिक परिस्थितीची सखोल माहिती दिली. सीमा सुरक्षेच्या दृष्टीने त्याचे महत्त्व सांगितले. प्रसंगानुसार भारतीय सैनिक परिस्थिती कशी हाताळतात, प्रतिकार करताना कोणत्या योजना आखतात या त्यांनी दिलेल्या माहितीतुन सैनिकांबद्दलचा आदर आणखीनच वाढला. कारगिल युद्ध व सर्जिकल स्ट्राइक यातील काही रोमांचकारी प्रसंग सरांनी सांगितले. सर्वांना स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, "आपल्या देशात बनवलेल्या वस्तू आपण वापरल्याने उद्योगधंदे वाढतील व पर्यायाने देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल".

चिखलदऱ्याच्या गुगामल परिसरातील घटना - या वनक्षेत्रात गस्त घालून परत येत असताना वनरक्षक व दोन मजुरांवर अस्वलाने हल्ला केला. हा हल्ला परतवून लावताना एक मजूर गंभीर जखमी झाला. नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार झाल्यानंतर तातडीने हालचाल करून श्री हिरालाल चौधरी यांनी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात त्यास नेऊन त्याचे प्राण वाचवले. श्री हिरालाल चौधरी ढाकणा वनक्षेत्रात वनपरिक्षेत्र अधिकारी आहेत. आपल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल सर्वांनाच अभिमान वाटतो .

### * अभिनंदन *

स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धक, ओंकार ट्रस्ट युवक कार्यकर्ता व आपला विद्यार्थी श्री. समीर यनपुरे यांची महाराष्ट्र महसूल विभागातील तलाठी पदावर निवड झाली. अथक परिश्रम चिकाटी व प्रतिकूल परिस्थितीत प्रामाणिकपणे प्रयत्न करून जिद्दीने त्यांनी हे यश मिळवले आहे .

**मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...!**

# पाकोळी बालवाडी



बालवाडीतील मुले पालकांच्या मदतीने ताईंनी पाठवलेले व्हिडिओ बघून सर्व उपक्रम पूर्ण करत आहेत. पालकही उत्साहाने यात सहभागी होत आहेत. राणी ताईंनी रांगोळी सोडणे, मनिषा ताईंनी पक्ष्यांची ओळख व परिचय, मोनाली ताईंनी काकडी सोलणे व



भौमितिक आकाराची ओळख, राजश्री ताईंनी वेगवेगळ्या आकारावर पिस्त्याच्या साली लावणे, पुष्पा ताईंनी फळभाज्यांचा परिचय अशा विविध विषयांवर व्हिडिओ करून पालक गटावर पाठवले. या व्हिडिओचे मुलांना खूप आकर्षण वाटते. ते मनापासून व्हिडिओची वाट बघत असतात. याशिवाय गाणी, गोष्टी, श्लोक मुलांना ऐकवले जातात. सततच्या वापराने, ऐकण्याने त्यांचे पाठांतरही चांगले होत आहे. गणपती उत्सवात राणी ताईंनी गणपती अथर्वशीर्ष, गणपतीची गाणी व गोष्टी मुलांना सांगितल्या.

■ **अभिप्राय :** नमस्कार. मी वेदांतची मम्मी, सौ. वर्षा मंगेश साखरे या कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षण घ्यावे लागेल याची कल्पना नव्हती. 'स्व'-रूपवर्धिनी पाकोळी शाळेमार्फत पालक ग्रुपवर आपल्या शिक्षका मुलांसाठी नवनवीन उपक्रम पाठवतात. आता शाळा चालू नाही परंतु मुलांचा अभ्यास झाला पाहिजे असे सर्वांना मनापासून वाटते. त्यातून त्यांची तळमळ देखील लक्षात येते. आपण पालकांनीही त्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे. ज्या पद्धतीने आपल्या शिक्षिका ग्रुप वरती मुलां- मुली करता नवनवीन अभ्यासक्रम पाठवतात, त्या पद्धतीने पालकांनीही आपल्या पाल्याकडून अभ्यास पूर्ण करून घेतला पाहिजे. अभ्यास घेतल्यानंतर मुले देखील आनंदी असतात. त्यांच्यात प्रगती होताना दिसते.

'स्व'-रूपवर्धिनी पाकोळी बालवाडीच्या समस्त शिक्षक वर्गाचे मनापासून आभार.





### * अभिनंदन *

आपल्या बालवाडीच्या शिक्षिका छायाताई , संगिता ताई, राणी ताई, पुष्पाताई पवार व बचगटाच्या वनिता ताईंनी आपले घर, काम सांभाळून कॉलेजची परिक्षा बाहेरुन देऊन चांगले यश संपादन केले आहे. सर्वांचे अभिनंदन.

**मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...!**

# समुपदेशन विभाग

## व्याख्यानमाला

**सौ. हर्षा जैन**

**विषय - स्त्रियांचे आरोग्य**

सध्याच्या कोरोनाच्या काळात आपण आपल्या तब्येतीची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. विशेषत: महिलांसाठी व्यायाम, सूर्यनमस्कार आणि योगासने यांची प्रात्यक्षिके दाखवून त्यांचे महत्त्व सांगितले.

**डॉ. मनिषा नारकर**

**विषय - महिलांचा आहार आणि दिनचर्या**

मनुष्य हा निसर्गात राहणारा प्राणी आहे. मनुष्यासाठी आहार, विहार, निद्रा, विश्रांती या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पक्षी, प्राणी हे जैविक घड्याळानुसार वागतात त्याचप्रमाणे मनुष्याने वागले पाहिजे. सूर्योदय ते सूर्यास्ताप्रमाणे आपली दिनचर्या असावी.

योगशास्त्रात पंचकोशाची माहिती दिली आहे. माणसाचे आयुष्य अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय या पाच कोषांवर अवलंबून असते. हे पाच कोष समृद्ध असतील तर आपण सुखी जीवन जगू शकतो.

आपल्या आहारात ६०% कार्बोदके, २०% प्रोटीन, २०% फॅट अश्याप्रकारे घटक असावेत. आहारबरोबर व्यायामही तितकाच महत्त्वाचा आहे.

# माहिती आणि तंत्रज्ञान समिती (IT commitee)

## प्रगतीच्या दिशेने एक नवे पाऊल

कोविड-१९ च्या नुकत्याच आलेल्या साथीने ब-याच देशांना हादरवून टाकले. या काळात आपली दैनंदिन कामे घरी राहूनच करणे गरजेचे होते आणि त्यासाठी सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर केला गेला.

‘स्व’-रूपवर्धिनीही याला अपवाद नव्हती. या सर्व परिस्थितीचा फटका आपल्या संस्थेलाही बसला. सर्व काळजी घेऊन घरून काम करण्याचे प्रयत्न वर्धिनीत झाले, पण ते करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.

‘रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल’ या उक्तीप्रमाणे, एकीकडे कोरोनाच्या कठीण काळाने संस्थेसमोर एक आव्हान उभे केले असले तरीही दुसरीकडे संस्थेला नवीन विचार करण्याची संधी मिळाली.

संस्थेला तंत्रज्ञानाच्या बाबतीत सर्वोत्तम बनवावे असा विचार करणारा एक गट डिसेंबर २०१९ पासून कार्यरत आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून आणि आलेल्या संकटाचे संधीत रूपांतर व्हावे या हेतूने, तंत्रज्ञान, डेटा सायन्स आणि मॅनेजमेन्ट ह्या क्षेत्रात काम करणारे वर्धिनीतील अनुभवी युवक एकत्र आले आणि त्यांनी जून २०२० च्या सुमारास अनौपचारिक 'आयटी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) समितीची' स्थापना केली. तंत्रज्ञानाचा यशस्वीरीत्या वापर करण्यासाठी संस्था सज्ज असावी हा या समितीच्या स्थापने मागचा हेतू आहे. समितीने हाती घेतलेले सर्वात पहिले काम म्हणजे ‘तांत्रिक सर्वेक्षण अहवाल’. वर्धिनीतील सर्व विभागांचे काही ठराविक मानांकनानुसार सर्वेक्षण करून या समितीने अहवाल तयार केला आणि भविष्यात येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी आत्तापासूनच काय उपाय करावे ह्याच्या सूचना संस्थेला केल्या. ट्रस्टी बोर्डाने आयटी समितीला जुलै महिन्यात औपचारिक मान्यता दिली. त्यामुळे समितीला एक नैतिक पाठबळ आले आणि त्यानंतर समितीने अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले.

## आयटी समितीचे उपक्रम :

■ **नॅसकॉम नोंदणी** - नॅसकॉम ही भारतातील एक अग्रगण्य संस्था. नॅसकॉम हा भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि बिझनेस प्रोसेस ऑउटसोर्सिंग यांचा संयुक्त उपक्रम. यात सामाजिक संस्थेची नोंदणी झाल्यास अनेक नामांकित सॉफ्टवेअर कंपन्यांची सॉफ्टवेअर उत्पादने आणि सेवा या सामाजिक संस्थेस देणगी म्हणून दिल्या जातात. ही नोंदणी झाल्यामुळे संस्थेला गूगल आणि मायक्रोसॉफ्ट या नामांकित कंपन्यांच्या काही सेवा आणि उत्पादने मोफत स्वरूपात उपलब्ध झाली.

■ **वेबसाइट** - विदेशातील किंवा दूर अंतरावरील लोकांपर्यंत यशस्वीरीत्या पोहोचण्यासाठी, वेबसाइट हे एक प्रभावी माध्यम आहे हे ओळखून आयटी समितीने संस्थेच्या वेबसाइटची नव्याने मांडणी करण्याचे काम हाती घेतले. प्रचार, प्रसार, प्रसिद्धी आणि निधी संकलन या महत्त्वाच्या बाबी साध्य करणे हा या नव्या मांडणी मागील हेतू आहे.

■ **माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण** - कुशल मनुष्यबळाला तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर कौशल्य विकास आणि पर्यायाने व्यक्ती, संस्था आणि समाजाचा विकास हा जलदगतीने होतो, असे आयटी समिती मानते. ह्या तत्वाला धरून आयटी समितीने सप्टेंबर महिन्यापासून माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण वर्गाचा उपक्रम हाती घेतला आहे. वर्धिनीतील कार्यकर्ते आणि कर्मचारी यांना सॉफ्टवेअर आणि ॲप्लिकेशनचे प्रशिक्षण देऊन त्याचा वापर संस्थेच्या अनेक कामांमध्ये सुलभतेने करता यावा यासाठी हा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

■ **i-TAP - INFORMATION TECHNOLOGY AWARENESS PROGRAMME** - ॲप्स, चॅट, लिंक, मिम्स हे शब्द आता सर्वांनाच माहीत झाले आहेत. पण एखादे साधन हाताशी आले, तरी त्याचा प्रभावी आणि योग्य वापर झाला नाही तर त्यामुळे सर्वांचे नुकसान होते. त्यामुळे ह्या गोष्टींचा योग्य वापर व्हावा आणि तो सर्व कार्यकर्त्यांपर्यंत सोप्या भाषेत पोहचावा या हेतूने आयटी समितीने i-TAP हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत दर आठवड्याला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन माहिती देणारा एक पानी लेख देत आहोत.

वरील उपक्रमांव्यतिरिक्त डिजिटल समाजमाध्यमे हाताळण्यासाठी संस्थेचे धोरण तयार करणे, डाटा मॅनेजमेण्ट ॲप्लिकेशन तयार करणे, टाटा प्रो एन्गेज सारख्या संस्थेबरोबर काही संयुक्त उपक्रम राबवणे असे काही उपक्रम आयटी समितीने हाती घेतले आहेत.

### समिती सदस्य

१. वेदांग बेहेरे (समिती प्रमुख) (एम.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स)
२. पुष्कर वाडेकर (समिती सहाय्यक) (बी. कॉम, कंपनी सेक्रेटरी)
३. निशिकांत वाईकर (सदस्य) (बी. एस. सी. इक्कॉलॉजि, सॉफ्टवेअर डिप्लोमा)
४. सुमित शेवडे (सदस्य) (एम. सी. ए.)
५. राहुल ताम्हाणे (सदस्य) (बी.इ. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनीरिंग)
६. नकुल थावरे (सदस्य) (एम.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स)
७. शुभम पारधी (सदस्य) (बी.एस.सी कॉम्प्युटर सायन्स, एम.सी.ए)
८. सागर काटदरे (सदस्य) (बी.इ. मानद)
९. केदार भंडारे (सदस्य) (एम.सी.एम)

### विभाग पालक

१. वैद्य विनेश नगरे
२. अमोल उंदरे

### प्रभारी जबाबदारी (वेबसाइट)

१. राजेश तळेकर (एम.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स)

समितीच्या कामातील सुधारणा आणि मार्गदर्शन यासाठी आपल्या बहुमूल्य सूचना आणि मार्गदर्शन वाचकांनी **it@swaroopwardhinee.org** या ई-मेल आयडीवर पाठवाव्यात.



## भावपूर्ण श्रद्धांजली

- समर्थ रामकृष्ण शाखेचे वर्धक व वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. केदार व श्री. मंदार पारगावकर यांचे वडील श्री. मुकुंद जगन्नाथ पारगावकर यांचे दुःखद निधन झाले.
- वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. पराग मुतालिक यांच्या आई श्रीमती ज्योती जयंत मुतालिक यांचे दुःखद निधन झाले.
- समर्थ रामकृष्ण शाखेचे वर्धक व युवक कार्यकर्ते श्री. संजय राचेल्ली यांचे वडील श्री. पेंटय्या लक्ष्मण राचेल्ली (वय ७३ वर्षे) यांचे निधन झाले.
- स्वामी योगानंद शाखेचा युवक गजानन शेंडये यांचे वडील श्री. रविंद्र शंकर शेंडये यांचे दुःखद निधन झाले.
- स्वामी योगानंद शाखेचा युवक राकेश चाळके यांच्या आईचे श्रीमती सुषमा प्रकाश शेळके यांचे दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.**

**वर्धिनीचा परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे**

**।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।**

